**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई.**

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दि.२१.१०.२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.**

दि.२१.१०.२०१३ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मधुकर गायकवाड | : | अध्यक्ष तथा कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री.बाळासाहेब कोळसे | : | सह सचिव (कामगार-७ अ), मंत्रालय, मुंबई. |
| ३. | श्री.शि.म.म्हात्रे | : | सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ४. | श्रीम. देशपांडे | : | वेल्फअर ॲडमिनिस्ट्रेशन,<br>कल्याण आयुक्त कार्यालय,नागपूर. |
| ५. | श्री.प्रकाश मा.देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. अनिल ढवळे | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री.केदार काळे | : | मालक प्रतिनिधी |
| ८. | श्री.रमेश सो.सारडा | : | मालक प्रतिनिधी |
| ९. | श्री.राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्री.दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| ११. | श्री.मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| १२. | श्रीम. राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |

सर्व प्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करुन संसदेच्या कामगार स्थायी समितीची पुर्वनियोजीत बैठक लांबल्याने बैठकीस उशिरा आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. बैठकीच्या सुरुवातीस

मा.अध्यक्ष यांनी मा.सचिव (कामगार) यांचे सुचनेनुसार मे.लेबरनेट सर्व्हिसेस इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या प्रतिनिधींनी बांधकाम कामगरांच्या कौशल्य वृध्दीसाठी त्यांना प्रशिक्षण देण्याबाबत प्रझेंटेशन दिले. बांधकाम कामगारांची कामामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टिने त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम या कंपनीमार्फत केले जाते. सध्या त्यांच्या कार्यशाळा संपूर्ण भारतभर चालू असून महाराष्ट्रात नागपूर येथे कार्यशाळा सुरु आहे. कामगारांना ओळखपत्र देणे तसेच मालकांकडून त्यांना कोणते फायदे व सुविधा दिल्या जातात, आपण कोणत्या बिल्डरकडे काम करतो त्याची माहितीही कंपनीमार्फत दिली जाते. यावर श्री.ढवळे यांनी अशी विचारणा केली की, एका कामगाराकरिता तुम्ही किती फि आकारता. एका कामगाराकरिता रु.४००/- फि आकारली जाते असे कंपनीच्या प्रतिनिधीने सांगितले. त्यावर मा.अध्यक्ष यांनी तुम्ही सर्व कागदपत्रासहीत तुमचा प्रस्ताव तयार करुन मंडळास सादर करावा असे सांगितले.

**ठराव :-**

मा.अध्यक्ष यांनी सर्व प्रथम काही महत्वाच्या गोष्टी सर्व सदस्यांना सांगितल्या, नविन योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याबाबत या बैठकीमध्ये निर्णय घ्यावयाचा आहे. त्यामध्ये बांधकाम कामगारांच्याबाबत नाविन्यपूर्ण जाहिराती तयार करुन त्या विविध ठिकाणी लावण्यात याव्यात. बांधकाम कामगार जास्त प्रमाणात नोंदीत होण्यासाठी एफ.एम., एस.टी. बसेस, बेस्ट बसेस, दुरदर्शन यावर जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात त्यासाठी लाभार्थी जनतेला मोफत संस्थांसाठी, संपर्कासाठी टोल फ्री सेंटरवर क्रमांक घेणे राहिल यासाठी एक समिती स्थापन करण्यात येऊन त्या समितीवर एक मालक प्रतिनधी व एक कामगार प्रतिनिधी असावेत असे श्री.डोंगरे यांनी प्रस्तावित केले. त्यास श्री. ढवळे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते ठराव मान्य झाला. जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी आर.सी. अथवा टेंडर मागवून एजन्सीची नेमणूक करावी लागेल असे अध्यक्षांनी सांगितले.

तसेच तज्ञ समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार इमारत बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून नोंदणीकृत कामगारांच्या मुलांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान शिक्षणासाठी टॅबलेट व लॅपटॉप देण्याबद्दल काही उपाययोजना करावयाची आहे असे मा.अध्यक्षांनी प्रतिपादन केले. तसेच तज्ञ समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित घरकुल योजना सध्या चालू करता येणार नसल्याचे मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थितांना सांगितले.

मा.अध्यक्ष यांनी बॅंक खात्याबाबत माहिती देताना युनियन बॅंक ऑफ इंडिया, बांद्रा येथे नव्याने इमारत बांधकाम कामगार मंडळाचे खाते उघडले असून, बॅंक ऑफ इंडिया,ताडदेव या शाखेतील

मंडळाचे खाते लवकरच बंद करण्यात येईल असे सांगितले. तसेच, नव्या बँक खात्याची माहिती शासनास कळवावी असेही सांगितले.

श्री.डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी मा.अध्यक्षांनी बालेवाडी, पुणे येथे बांधकाम कामगारांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमास किती खर्च झाला अशी विचारणा केली. यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, एकूण खर्च रु.१०.६३ लाख झाला. मा.श्री.कोळसे, सह सचिव (कामगार-७) यांनी असे सुचविले की, कोणत्याही कार्यक्रमाकरिता रु.१० लाखापेक्षा जास्त खर्च येत असेल तर त्यासाठी मंडळाने शासन निर्णयाप्रमाणे ई-टेंडर मागवावे. हा कार्यक्रम इमारत बांधकाम कामगार मंडळ व घरेलू कामगार मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला होता व टेंडरसाठी पुरेसा कालावधी न मिळाल्याने दरपत्रके मागवून कार्यक्रम निश्चित केला व यशस्वीरित्या पार पाडला असे अध्यक्षांनी सांगितले.

**ठराव:-**

श्री.सारडा यांनी प्रस्तावित खर्चास मान्यता देण्याचे सुचित केले व त्यास श्री.ढवळे यांनी अनुमोदन दिले व बहुमताने ठराव मान्य झाला.

मा.मंत्री महोदय यांच्या सुचनेनुसार मा.सचिव यांचे पत्रानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळामार्फत जर्मन सोशल ॲक्सीडंट इन्शुरन्स्, जर्मनी यांच्याद्वारे बांधकाम कामगारांचे आरोग्य व सुरक्षितता याबदद्ल कामगार विभागातील अधिका-यांमार्फत ११ ऑक्टोंबर, २०१३ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असल्याचे मा.अध्यक्षांनी सर्व मंडळ सदस्यांना सांगीतले. तसेच वेळ कमी असल्याने हा कार्यक्रम आयोजित करण्याची प्रक्रिया कोणतीही निविदा न काढता करण्यात आल्याचे अध्यक्षांनी सर्वांना कळविले. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, हॉलसाठी रु. ७४,०००/- व माननीय अथिती तसेच आमंत्रितांच्या जेवणापोटी अंदाजे रु.२,००,०००/- एवढा खर्च झाला.

**ठराव :-**

सर्व सदस्यांनी कार्यक्रमास आलेल्या खर्चास मान्यता दिली व तसा ठराव मान्य करण्यात आला.

श्री. डोंगरे यांनी असे प्रतिपादन केले की, नोंदित बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला मंडळाच्या योजनेचे लाभ मिळण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे नोंदित बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु झाल्यासही त्याला हा लाभ मिळावा असे सूचविले.

शासनाच्या जलसंपदा, नगर विकास व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांनी बैठकीस नियमित उपस्थित रहाणे गरजेचे आहे. याबाबत सर्व सदस्यांनी मा. अध्यक्षांना त्यांनी प्रत्येक बैठकीस

हजर रहाण्याबाबत पत्र द्यावे अशी विनंती केली. यावर मा. अध्यक्षांनी पत्र देण्यात येईल असे प्रतिपादन केले.

श्री.डोंगरे यांनी स्थलांतरीत कामगारांच्या नोंदणीबाबत महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांचा विचार होत नाही. त्यामुळे स्थलांतरीत कामगारांची नोंदणी होत नाही. याबाबतचा ९० दिवसांचा प्रस्ताव पडून आहे. याबाबत केंद्र शासनाच्या निर्णयाची वाट न पहाता शासनाला दिलेल्या अधिकाराप्रमाणे लॉ ॲन्ड ज्युडिशियरी नुसार त्यामध्ये बदल करण्यासाठी शासनास पुन्हा प्रस्ताव द्यावा असे ठरले. मंडळाकडे जो सेस जमा आहे, त्याचा लाभ बांधकाम कामगारांना मिळाला पाहिजे. मंडळाच्या सर्व योजनांचा लाभ बांधकाम कामगारांना मिळाला पाहिजे असे सांगितले.

मा. अध्यक्षांनी बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता सर्व जिल्हा स्तरावर जिल्हा सनियंत्रण समिती गठित करण्यास सांगितले. तसेच बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरिता सर्व जिल्हास्तरावर जिल्हा सनियंत्रण समिती नोंदणी कार्यालयाची संख्या वाढवून सदर नोंदणी तलाठी, मामलेदार, ग्रामसेवक, नगरसेवक, जिल्हाधिकारी, सहायक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांचेमार्फत नोंदणी करता येईल असे सांगितले.

श्री.काळे यांनी असे सांगितले की, बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपरिषद, ग्रामपंचायत व पंचायत समिती या कार्यालयात सुध्दा बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात यावी, त्यामुळे बांधकाम कामगारांची नोंदणी मोठया प्रमाणात होईल.

**ठरावः-**

बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी संबंधित इतर खात्यातील अधिकारी नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करणेची सुचना श्री.काळे यांनी केली व त्यास श्री.डोंगरे यांनी अनुमोदन दिले. ठराव सर्वानुमते मान्य झाला.

मा.अध्यक्षांनी महाराष्ट्रातील गोंदिया, भंडारा व अहमदनगर येथे मनरेगा खाली मोठया प्रमाणात बांधकाम कामगारांची नोंदणी झाल्याची माहिती सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्हयामध्ये सुध्दा बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे प्रमाण वाढल्यास बांधकाम कामगार मंडळाची व्याप्ती वाढेल असे सांगितले.

श्री.काळे व सर्व सदस्यांनी यांनी असे प्रतिपादन केले की, मनरेगाच्या बैठकीस कामगार प्रतिनिधींना बोलाविले जात नाही, तरी मा. अध्यक्षांनी या बैठकीस कामगार प्रतिनिधींना बोलविण्यात यावे यासंदर्भात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवावे.

श्री.डोंगरे यांनी बांधकाम कामगारांच्या नोंदणी संदर्भात जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती गठीत करावी यावर मा. अध्यक्षपदी कामगार खात्याचे अधिकारी जिल्हास्तरावरील सहायक व इतर खात्याचे अधिकारी समितीवर असतील असे प्रतिपादन केले.

श्री. डोंगरे यांनी प्रतिपादन केले की, नैसर्गिक मृत्यु झाला तर त्या कामगाराला कोणते लाभ दिले जातात याबाबत मंडळाने लेखी पत्र द्यावे.

**ठराव :-**

श्री.फुले यांनी ८२,३०० बांधकाम कामगारांचा विमा उतरविला असून त्याची माहिती दि.२७ जून, २०१३ पर्यंत उपलब्ध असल्याचे सांगून नविन नोंदित बांधकाम कामगारांसाठीही विमा उतरविण्यात यावा, असे सूचविले. यावर मा.अध्यक्षांनी विमा कंपनीला आगावु ठेव देण्याचे सांगितले यावर सर्व मंडळ सदस्यांनी चर्चा केली व नोंदित कामगारांची संख्या वाढेल त्यानुसार विमा कंपनीला ठेव देण्यात यावी असे सांगितले. सर्वानुमते या ठरावास मान्यता देण्यात आली.

श्री. डोंगरे व सर्व सदस्यांनी असे सांगितले की, बांधकाम कामगाराला हॉस्पीटलमध्ये दाखल केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना उदरनिर्वाह भत्ता देण्यात यावा. बांधकाम कामगारास जो उदरनिर्वाह भत्ता मिळतो तो फारच कमी असल्यामुळे दर दिवशी प्रत्येकी रु.१००/- भत्ता देण्यात यावा, असे ठरले.

उदरनिर्वाह भत्ता दर दिवशी रु.१००/- कामगार दवाखान्यात भरती झाल्यास भरती काळापुरता त्यांच्या पत्नीस देण्यात यावा असे डोंगरे यांनी सुचित केले. श्री.देवतळे यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते मान्य करण्यात आला.

श्री.डोंगरे व श्री.देवतळे यांनी प्रायोगिक तत्वावर फिरते मोबाईल पाळणाघर सुरु करण्याबाबत सुचविले. यावर मा.अध्यक्षांनी उप समितीने जाहिरातीचा नमुना तयार करुन जाहिरात देण्यात यावी असे सांगितले. त्यावर श्री. डोंगरे यांनी सांगितले की, यापूर्वी नमूना सादर केलेला आहे.

श्री.डोंगरे यांनी वित्तीय गुंतवणूकीबाबत असे प्रतिपादन केले की, बांधकाम कामगार मंडळाअंतर्गत वित्तीय धोरण निश्चित करुन वित्त विभागाला प्रस्ताव पाठवावा यावर श्री.म्हात्रे यांनी

प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे मा. अध्यक्षांनी श्री. म्हात्रे यांना प्रति नियुक्तीवर लेखाधिकारी सुचविण्याचेही सांगितले.

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, स्वावलंबन योजना ही केंद्र शासनाची मंजूर झालेली योजना आहे. यामध्ये महिन्याला रु.१००/- भरावयाचे असून हि योजना २०१७ पर्यंत बॅक ऑफ इंडिया मार्फत चालविली जाणार आहे. तसेच बँक लाभार्थींना पासबुकाचे वितरण करणार आहे. ही योजना पेन्शन योजनेप्रमाणे चालविली जात असून दर महिन्याला पैसे खात्यात जमा होतील अशी स्वावलंबन योजना आहे.

श्री.काळे यांनी असे प्रतिपादन केले कि, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ हे संपूर्ण महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांसाठी आहे. त्यामुळे ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात झालेली नाही, असा बांधकाम कामगार कामावर असताना मृत पावला तर त्याला काही मदत करण्यात यावी असे सांगितले.

यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले कि, बांधकाम कामगाराची मंडळात नोंदणी झालेली असेल तरच त्याला लाभ देता येईल. परंतु कामगार कायद्यातील तरतूदीनुसार अनोंदित बांधकाम कामगारांना लाभ देता येणार नाही असे सांगितले.

श्री.डोंगरे यांनी स्थानिक पातळीवर राष्ट्रीयीकृत बॅकेचे खाते असणे गरजेचे आहे असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्ष यांनी राष्ट्रीयीकृत बॅका महाराष्ट्रात ई-बॅकिंगव्दारे जोडल्या असल्यामुळे बांधकाम कामगारांना कोणत्याही बॅकेतून पैसे मिळू शकतील असे सांगितले.

मा.अध्यक्षांनी सर्व सदस्यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे मंडळाने अंमलबजावणी करावी असे सांगून मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता दिली.

मा.अध्यक्ष यांनी बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हास्तरावर आरोग्य व अपघात विमा योजना कार्यशाळेचे आयोजन करावे असे सांगितले. त्यानुसार मुंबईमध्ये १ व नागपूरमध्ये २ कार्यशाळांचे आयोजन करावे. त्या व्यतिरिक्त हॉस्पीटलची संख्या वाढवावी त्यामुळे बांधकाम कामगारांच्या रोगाचे निदान होवून त्यांना औषधोपचार वेळेवर मिळेल, असे श्री.डोंगरे यांनी सांगितले.

श्री.देवतळे यांनी प्रतिपादन केले की, चंद्रपूर जिल्हयात डोळे व दात यांचे दवाखाने उपलब्ध नसून त्या ठिकाणी हॉस्पीटलची संख्या वाढवावी. श्री.काळे यांनी प्रत्येक तालुक्यास याबाबत पत्र

पाठवावे असे सांगितले. यावर मा.अध्यक्ष यांनी यादी मागवून घेतली आहे. ती प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

मा.अध्यक्षांनी बांधकाम कामगारांना दिवाळी भेट देण्यात यावी या संदर्भात मा.मंत्री महोदय व मा.सचिव (कामगार) यांनी निर्देश दिल्यानुसार सर्व सदस्यांनी बांधकाम कामगारांना रु.५०००/- पर्यंत दिवाळी भेट म्हणून वस्तूंचे वाटप करण्यात यावे. यावर श्री.डोंगरे यांनी मच्छरदाणी,ब्लॅकेट, जेवणाचा डबा, चटई, चादर इत्यादी वस्तू बांधकाम कामगारांना देण्यात याव्यात असे सुचविले. यावर सर्व सदस्यांनी टेंडर मागवावे असे सांगितले. उप समिती नेमून त्या समितीमध्ये १ कामगार प्रतिनिधी व १ मालक प्रतिनिधी असेल, त्या समितीसमोर सदरचा विषय ठेवण्यात यावा असे चर्चेअंती ठरले. तसेच समिती बैठकीत ठरवेल त्या वस्तुंची निवड करण्याअंती राहिल.

**ठराव:-**

बांधकाम कामगारांना भेट वस्तू म्हणून १ मच्छरदाणी, १ ब्लॅकेट, २ चादरी, १ जेवणाचा डबा इतके साहित्य देण्याबद्दल व साहित्यात आवश्यकतेनुसार वाढ करण्याबाबत श्री.डोंगरे यांनी सूचना केली व त्याला श्री.ढवळे यांनी अनुमोदन दिले. व सर्वानुमते ठराव मान्य करण्यात आला.

बांधकाम कामगारांच्या ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलांना टॅबलेट व १० वी उत्तीर्ण व पुढील शिक्षण घेणा-या मुलांना लॅपटॉप देण्यात यावा असे तज्ञ समितीच्या बैठकीत मा.मंत्री महोदयांनी सुचित केल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. यासाठी एक अभ्यास समिती नेमून त्यावर निर्णय घेण्यात यावा, असे तज्ञ समितीच्या बैठकीत मा.मंत्रीमहोदयांनी सुचित केल्याचे मा.अध्यक्षांनी सांगितले. यासाठी एक अभ्यास समिती नेमून वाटप निकषावर निर्णय घेण्यात येईल यावर श्री. डोंगरे यांनी सांगितले. अभ्यास समितीवर एक मालक प्रतिनिधी व एक कामगार प्रतिनिधी यांची नेमणूक करण्याचे सुचित केले. या समितीवर श्री. प्रकाश देवतळे व श्री. मुनावर शेख यांची नावे निश्चित करण्यात आली.

**ठराव**

पात्र बांधकाम कामगारांच्या मुलांपैकी ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलांना टॅबलेट व १० वी उत्तीर्ण व त्यापुढील शिक्षण घेणा-या मुलांना लॅपटॉप देण्याचे श्री.ढवळे यांनी सुचित केले सदर योजना कामगारांच्या दोन अपत्यापर्यंतच लागु असल्याचे श्री.ढवळे यांनी सुचित केले व त्यास श्री.डोंगरे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते ठराव मान्य झाला.

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, यानंतर नोंदित बांधकाम कामगार लाभार्थींना चेक देण्यात येणार नसून, यापुढे संबंधित बांधकाम कामगाराच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात येईल.

श्री.फुले यांनी अशी सूचना केली की,ज्यावेळी नोंदणी करण्यासाठी अधिकारी इमारत बांधकामाच्या ठिकाणी जातो त्यावेळी त्या ठिकाणी बहूतेक वेळी बांधकाम कामगार उपलब्ध नसतात. त्यासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. या अधिकाऱ्याने दिवसातून ३-४ तास बांधकामाच्या ठिकाणी जावून बांधकाम कामगारांना मिळत असलेले फायदे, लाभ व नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती द्यावी व त्या अधिकाऱ्याच्या कामाबाबत उद्दिष्ठ ठरविण्यात यावे.

श्री.पोटरे, माजी कक्ष अधिकारी यांची मंडळाच्या सचिव पदी नेमणूक करण्यात यावी असे सर्व सदस्यांनी मा.अध्यक्षांना प्रतिपादन केले. त्यास मा.अध्यक्षांनी श्री.पोटरे यांची सचिव (CEO) पदी शासन मान्यता असल्यास नियुक्ती करता येईल त्यासाठी त्यांची संमती आली असून त्यानुसार शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगितले.

**<u>ठराव</u>**

बांधकाम प्रबोधिनी (Construction Academy) उभारणी करीता या प्रस्तावानुसार प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टन्सीद्वारे सहकार्य घेणे गरजेचे आहे असे श्री. ढवळे यांनी सूचविले. चर्चेअंती अध्यक्षांना सांगितले की, सूचनेप्रमाणे ठरावास मंजूरी राहिल.

श्री. ढवळे यांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सल्टंटसाठी निविदा मागवावी असे सुचविले. त्यास श्री.सारडा यांनी अनुमोदन दिले सर्वानुमते ठराव मान्य झाला.

श्री.काळे यांनी दिवाळी अंकामध्ये बांधकाम कामगारांविषयी जाहिरात देण्यात यावी, असे प्रतिपादन केले.

यापुढील मंडळाची बैठक नागपूर येथे घेण्यात येईल असे मा. अध्यक्षांनी सर्व उपस्थितांना सांगितले.

सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा. अध्यक्षांनी घोषित केले.

**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याण मंडळ,**